-2260- · 933

ग्रामीण भागामध्ये शौचालय बांधणे सक्तीचे करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
परिपत्रक क्र. संकीर्ण १०९६/ प्र. २९५/ २२
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दि. १५ डिसेंबर, १९९८.

वाचा :- शासन परिपत्रक क्र. ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
संकीर्ण १०९६/ प्र. २९५/ २२, दि. ८ ऑक्टोबर, ९६

परिपत्रक :-

शासन परिपत्रकाच्या दि. ८ ऑक्टोबर, ९६ च्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविण्यात आले आहे की, यापुढे ग्रामपंचायतीच्या हद्दीत इमारतीचे बांधकाम करतांना त्यामध्ये शौचालये बांधण्याची अट अंतर्भूत करावी, व त्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बांधकामास परवानगी देवू नये अशा प्रकारच्या सूचना सर्व ग्रामपंचायतींना देण्यात याव्यात.

२. तथापि, आता शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, सदरहू दि. ८ ऑक्टोबर, ९६ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी ग्रामपंचायतीकडून करण्यात येत नाही. यास्तव सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना शासन पुन: सूचना देत आहे की ग्रामपंचायतीने इमारत बांधकामांना परवानगी देतांना शौचालय बांधण्याची तरतूद अनिवार्य करण्यात यावी. व त्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बांधकामास परवानगी देऊ नये अशा प्रकारच्या सूचना आपण सर्व ग्रामपंचातींनां देण्यात याव्यात. तसेच सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ रा. का. पवार ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
विभागीय आयुक्त [सर्व]